# अंडी व्यवसाय एक सुवर्णसंधी



कु. हृषीकेश सं. संसारे
कृषी पदवी विद्यार्थी
डॉ. नेहा दि. काळे
सहाय्यक प्राध्यापिका
प्रा. टी. डी. साबळे
सहाय्यक प्राध्यापक
श्रमशक्ती कृषी महाविद्यालय, संगमनेर, अहमदनगर

कुक्कुटपालन व्यवसायामध्ये मासाबरोबरच अंड्यालाही अनन्य व्यवसायामध्ये साधारण महत्त्व आहे. अंड्यामध्ये उच्चप्रतीची प्रथिने, जीवनसत्त्वे, खनिजे असतात. अंडी हा दुसऱ्या कोणत्याही स्रोतापासून मिळणाऱ्या प्रथिनांच्या तुलनेने अतिशय कमी किमतीत जास्त पौष्टिक घटक आहे.

आपल्याकडील अतिरिक्त उत्पादित झालेल्या, न विकल्या गेलेल्या, प्रतवारी कमी असलेल्या अंड्यांवर प्रक्रिया करता येते. अंड्यापासून लोणचे, जॅम, विविध पदार्थ बनवून उत्पन्न वाढविणे शक्य आहे.

## अंड्यापासून मिळणारे घटक:

| घटक | प्रमाण (%) |
|---|---|
| पाणी | ७३.५ ते ७४.५ |
| प्रथिने | १२.८ ते १३.५ |
| स्निग्ध पदार्थ | १०.५ ते ११.८ |
| खनिजे | ०.८ ते १ |

सद्य:स्थितीत भारताचा कुक्कुटवर्गीय पक्ष्यांच्या संख्येत (८५१.८१ दश लक्ष) जगात पाचवा क्रमांक लागतो. त्यांच्यापासून वार्षिक १०३.३२ अब्ज एवढे अंडी उत्पादन मिळते. भारतामध्ये वार्षिक अंडी उत्पादन वाढ ५.७ टक्के आहे. जागतिक मानकानुसार (ICMR) प्रति व्यक्तीला वर्षाकाठी १८० अंड्यांचे सेवन केले पाहिजेत. पण भारतामध्ये वार्षिक प्रति माणशी अंडी उपलब्धता ही ६६ अंडी एवढीच आहे, त्यामुळे एवढ्या मोठ्या लोकसंख्येला अंड्यासारख्या स्वस्त व उत्तम प्रथिनांच्या स्त्रोताला मुकावे लागत आहे.

उन्हाळ्याच्या हंगामात अंड्यांना अपेक्षित किंमत व बाजारपेठ मिळत नाही, जे कधी कधी उत्पादन खर्चही भरून निघत नाही ज्यामुळे पोल्ट्रीचालक तसेच विक्रेत्याला नुकसानकारक ठरते. पोल्ट्रीचालकाला प्रति अंडी मिळणारी किंमत ३ ते ४ रुपये एवढीच मिळते. अंडी विक्रीच्या बरोबरीने अंडी प्रक्रिया उद्योगामध्येही चांगली संधी आहे. आधुनिक प्रक्रिया तंत्रज्ञानाचा अवलंब उत्पन्न वाढविता येणे शक्य आहे. आज जागतिक स्तरावर वनस्पतिजन्य प्रथिनांचे स्रोत अपुरे पडत असल्याने माणसाच्या आहारामध्ये मांस, अंडी, दूध इत्यादी स्रोतांचा समावेश असणे आवश्यक आहे. यामध्ये अंडी व त्यावर प्रक्रिया केलेले पदार्थ हा चांगला मार्ग उपलब्ध आहे. सर्वात स्वस्त, उत्तम पोषणतत्त्वे असणाऱ्या तसेच शून्य भेसळ असलेला पदार्थ म्हणून अंड्याचा रोजच्या आहारात समावेश आवश्यक आहे. तसेच कोरोनाच्या काळात अंडी यास एक अनन्यसाधारण महत्व आल्याने सध्याच्या काळात अंड्याच्या किमतीत लक्षणीय वाढ झाली असून, प्रतीनाग ६ ते ७ रुपये असा भाव आहे.

## अंड्याचे आहारातील फायदे:

- कोंबडींची अंडी मोठ्या प्रमाणात जगातील अनेक प्रदेशांमध्ये खाण्यासाठी वापरली जातात. ज्यांची हाडे कमकुवत असतात, अशांची हाडे मजबूत बनतात. हाडांची योग्य प्रकारे योग्य वेळी वाढ ठेवते. हाडे झिजण्यापासून बचाव होतो.
- रोज दोन उकडलेली अंडी खाल्ल्याने आपले डोळ्याची नजर तेज बनते, व आपल्या डोळ्यांमधून सर्व घाण बाहेर पडते.
- अंड्यामध्ये नऊ ॲनिमो ॲसिड आहेत जे आपल्या शरीरासाठी अत्यंत लाभदायक आहेत. व्हिटॅमिन अ, ब, ब १२ आणि व्हिटॅमिन डी, ई हे अंड्यामध्ये आहेत.
- अंड्यामध्ये ॲंटीऑक्सिडेंट्स ल्युटीन आणि जिंजेथिन आहे ज्यामुळे आपल्या डोळ्यांवर पडणारे अनितील किरण नष्ट करते. अंडी खाल्ल्याने आपले वजन कमी होऊ शकते, अंडी खाल्ल्याने आपल्याला भूक कमी लागते, आणि आपण जेवण प्रमाणात करतो. त्यामुळे आपले वजन संतुलित राहते. यापेक्षाही अनेक बरेच आजार अंडी खाल्ल्याने नष्ट होतात.

## अंडी उत्पादनासाठी कोंबड्यांच्या जाती:

जेव्हा आपण गावरान अंडी उत्पादनाचा विचार करतो तेव्हा काही विशिष्ट जाती आपल्या डोळ्यांसमोर येतात त्यापैकी ह्या जाती अतिशय काटक असून उत्तम रोगप्रतिकार शक्ति अंगभूत असलेल्या आहेत.

- RIR (ऱ्होड आइलैंड रेड): वजन वाढ धीम्या गतीने ६ महिन्यानंतर अंडी उत्पादन सुरु एका चक्रात २२० ते २५० अंडी उत्पादन सर्वोत्कृष्ट लेयर
- ब्लैक अस्ट्रॉलॉर्प: सर्वोत्कृष्ट बहुपयोगी ब्रीड ३ महिन्यात २ किलो पर्यंत वाढ अणि एका चक्रत १६०-२०० अंडी उत्पादन
- ग्रामप्रिया: १८० ते २०० अंडी
- देहलम रेड: २०० ते २२० अंडी प्रती वर्ष उत्पादन
- गिरिराज: २ महिन्यात १ किलो वजन वाढ अणि एक अंडी चक्रात १५० अंडी उत्पादन
- वनराज: २ महिन्यात १ किलो वजन वाढ अणि एका अंडी चक्रात १२० ते १६० अंडी उत्पादन
- कडकनाथ: औषधी गुणधर्मांसाठी प्रसिद्ध देशी वाण, धीमी वजन वाढ, परंतु पौष्टिक. ५ महिन्यात १ किलो वाढ अणि एक चक्रात ६० ते ८० अंडी उत्पादन.

**व्यवसाय सुरु करण्यासाठी शेडची उभारणी:**

शेतकऱ्यांनी आपल्या गोठ्यानजिक किंवा शेतामध्ये शेडची उभारणी करावी. साधारण १ ते १५ वर्गफूट प्रती पक्षी या हिशोबाने आपल्या गरजेनुसार पक्क्या शेडची उभारणी करावी. मध्यभागी १० ते १२ फुट उंच आणि दोन्ही बाजूस ८ ते १० उत उंची असावी. शेडला २ ते ३ फुट उंच भिंत असावी. चीकेन मेष या जाळीच्या सहायाने शेड बंधिस्त करावे. जमिनीवर फारशी किंवा कोबा करावा. कोंबड्यांना मुक्त संचारासाठी शेडला लागून मोकळी कमपाउंड जाली मारलेली जागा असावी.

**उत्पन्न-खर्च:**

- शेतकऱ्यांनी एक दिवसाच्या पिल्ला पासून सुरुवात करावी. एक दिवसाचे पिल्लू घेऊन ते अंडयावर येई पर्यंत अंदाजे १२० ते १५० रुपये खर्च होतो.
- १०० कोंबड्यांपैकी ६० ते ७० माद्या निघाल्यास ४० ते ४५ अंडी अंदाजे दररोज मिळणे अपेक्षित आहे. बाजारात या अंडयाला ५ ते ८ रुपये दर मिळतो. येथे आपला एक अंडे तयार करायचा खर्च २ ते ३ रूपये एवढा होतो.
- अंडी विक्रीतील उत्पन्नासोबतच उत्तम असे कोंबडी खत देखील मिळते. घरातील वाया गेलेले अन्न, भाजीपाला, धान्य किंवा आंतरपीक म्हणून घेतलेली मक्का यांचा वापर केल्यास उत्पादन खर्च आणखी कमी करता येऊ शकतो.
- ७२ आठवड्यांपर्यंत उत्पादन घेऊन नंतर हे पक्षी कत्तल केले जावेत. यावेळी सर्वसाधारण १५० ते २०० रूपयाना विकले जातात. हे अतिरिक्त उत्पन्न आणि अतिरिक्त नफा ठरतो.

**एक दिवसाचे पिल्लू घेतल्यावर काय काळजी घ्याल ?**

- मध्यवर्ती अंडी उबवनि केंद्रातून किंवा खाजगी हॅचरी मधून एक दिवसाची पिल्ल १०० पिल्लू प्रति बॉक्स अश्या स्वरूपात पॅक करुन दिली जातात. शेतकऱ्यांनी पिल्ले पाहून विकत घ्यावीत. पिल्ले सुदृढ, निरोगी आणि चपळ असावीत. तसेच त्यांना पहिल्या दिवशी मरेक्स ही लस दिल्याची खात्री करावी.
- पिल्ले प्रवासातून फार्मवर आणत असताना अलगद जास्त हेलकावे न देता आणावेत. फार्मवर पिल्ले पोहोचताच बॉक्स उघडून पिल्लांची मरतुक झाली आहे का ते पहावे. मेलेली पिले वेगळी काढावित. साधारण १ लीटर उकळलेल्या पाण्यात १०० ग्राम गुळ किंवा एलेक्ट्रोल पाउडर मिक्स करुन, थंड करुन घ्यावे. नंतर प्रत्येक पिल्लाची चोच २ ते ३ वेळा या पाण्यात बुडवून त्यास पाणी पिण्यास शिकवावे आणि नियंत्रित तापमान तैयार केलेल्या ब्रूडर मधे सोडावे. पहिले काही तास गुळ पाणी पिने खुप महत्वाचे आहे. कारण गुळ पाण्यामुळे पिलांच्या आतड्यात असणारा चिकट पदार्थ बाहेर येऊन पोट वाहण्यास मदत होते. असे न झाल्यास विष्ठेची जागा तुंबुन मरतुक होउ शकते.
- साधारण ४ तासांनंतर मक्का भरडा किंवा तांदळाची कणी खाऊ घालावी. दुसऱ्या दिवशी चिक स्टार्टर हे खाद्य पदार्थ सुरु करावेत.
- साधारण पहिले २१ दिवस ब्रूडिंग करावे. त्यानंतर पिलांच्या अंगावर पिसे तयार होऊ लागताच ते स्वतःच तापमान स्वतः नियंत्रित करू शकतात. या पुढे काही दिवस पिल्ल शेड मधे सोडावेत आणि नंतर कंपाउंड मधे मोकळे सोडावेत. एक महिना पूर्ण होताच पिल्लाना चिक फिनिशर हे खाद्य पदार्थ सुरु करावेत.
- ग्रोइंग स्टेजमधे (४ ते ५ महीने) पक्षांची वाढ घ्यायची असते. या अवस्थेत नर आणि मादी पक्षी वेगळे करावेत आणि अनावश्यक नर विकुन टाकावेत किंवा मांस उत्पादनाच्या दृष्टीने स्वतंत्र वाढ़वावेत. या काळात योग्य शारीरिक वाढ अत्यंत महत्वाची असते. त्यांना मुक्त संचार उपलब्ध करावा व ग्रोवर फीड खाऊ घालव ज्यात १५ ते १६ % प्रोटीन असेल. योग्य प्रमाणात खनिज मिश्रण तसेच जिवनसत्वांचा पुरवठा अपेक्षित आहे. लासोटा बूस्टर, फौलपॉक्स बूस्टर या लसी देऊन घ्याव्यात.
- अंडी घालण्याच्या स्टेजमध्ये (६ ते १८ महिने) वयाच्या २४ आठवड्यानंतर पक्षी अंडी देण्यास सुरुवात करतात. या काळात पक्षांना १८ ते १९ % प्रोटीन युक्त आहार ज्याला लेयींग मेष म्हणतात तो द्यावा. त्यासोबत ५ % कॅल्शियम स्त्रोत द्यावा. तसेच अंडी घालण्यासाठी नेस्ट बॉक्स पुरवावेत प्रति ५ कोंबडी एक या प्रमाणात. साधारण वयाच्या ७२ आठवड्यांपर्यंत उत्पादन घ्यावे.
- मौल्टिंग स्टेज: ७२ आठवडे अंडी दिल्यानंतर पक्षी मौल्टिंग अवसस्थेत जातात, ज्यामधे पक्षी आपले पीसे गाळतात आणि त्याजागी नविन पीसे उगावतात. शक्यतो या अवस्थेत पक्षी कत्तलीसाठी विकावेत. या टप्प्यानंतर उच्च अंडी उत्पादन मिळत नाही.

**मूल्यवर्धित पदार्थ:**

- अंड्याचे लोणचे हा एक खूप प्रसिद्ध आणि पौष्टिक खाद्यपदार्थ आहे.
- कैरी, मिरची, लिंबू, आवळा, गाजराचे लोणचे आपल्याकडे तयार केले जाते. त्याच प्रमाणे मटण आणि अंड्यापासून लोणचे बनवण्याच्या पद्धती भारतामध्ये विकसित झाल्या आहेत.
- विविध प्रथिनयुक्त पौष्टिक तत्त्वे जसे की मांस, मासे, अंडी इत्यादी जास्त काळ टिकण्यासाठी तसेच वाढीव किंमत मिळण्यासाठी त्यांच्यावर विविध प्रकिया केल्या जातात. त्यापैकी लोणचे बनवणे ही एक पद्धत प्रचलित आहे. अंड्यापासून लोणचे बनविताना खाद्यतेल व व्हिनेगार यांचा वापर केला जातो. ज्यामुळे लोणच्याची चव, स्वाद व साठवणूक क्षमता वाढते. त्यामुळे तो शरीरास अपायकारक नाही.

(संपर्क: +९१ ८२०८८२६९४२)

★ ★ ★